!! श्री !!

शिवसेना

खासदार चंद्रकांत खैरे
शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प २००/१२/०३/१५

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# पेट्रोलपंप चालकांच्या ऑईल बाबतच्या तक्रारीचा निपटरा करा : खासदार चंद्रकांत खैरे

**केंद्रिय पेट्रोलियम मंत्री धमेंद्र प्रधान यांच्याकडे लोकसभा नियम ३७७ नुसार मागणी**

**संभाजीनगर : ( ता. १९ )** पेट्रोलपंप चालक यांच्या ऑईल बाबतच्या नियमात किरकोळ सुधारणा करुन ऑईल मार्केटिंग क्षेत्रातील डिलर्स व डिस्ट्रिब्युटर्स यांना समान न्याय देण्याची मागणी शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी लोकसभेच्या नियम ३७७ नुसार केंद्रिय पेट्रोलियम मंत्री धमेंद्र प्रधान यांच्याकडे केली. गेल्या महिन्यात ऑईल विक्रीचे लक्ष्य न पूर्ण केलेल्या पेट्रोल पंपास पुन्हा चालु करण्याची परवागनी देण्याची मागणी केली.

पेट्रोल पंप चालकांना प्रत्येकी जे ऑईल विक्रीचे टार्गेट दिले जाते. ते जर पूर्ण झाले नाही किंवा त्याची विक्री झाली नाही. तरीही ऑईल कंपन्या पुन्हा तेवढेच टार्गेट देत असता. डेपोधारकांकडे जमा असलेल्या शिल्लकीतून प्रत्येक वेळा तेवढी किंमती कपात करण्यात येते. वस्तुस्थिती पाहता इतके ऑईल विक्री झाले नाही तर ते पडून राहते. व नाईलाजाने पंपधारकांना तोटा होता.

ऑईल कंपन्याकडून डिस्ट्रिब्यूटर्स लोकांना हवते तितकेच व कमी किंमतीत पुरवठा केल्याने ऑईल ग्राहक त्यांच्याकडून ऑईल खरेदी करतात. यामुळे पंपधारकामध्ये तीव्र नाराजी उमटते. लुब्रीकेंन्ट ऑईलच्या या दुप्पट्टी धोरणामुळे पंपधारक नेहमी तक्रारी करतात. याकडे पेट्रोलियम व नॅचरल गॅस मंत्र्यांनी या नियमात किरकोळ बदल करुन सर्वांना समान न्याय देण्याची मागणी शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी केली. तसेच या नियमामुळे लोकसभा क्षेत्रातील हिंदूस्थान पेट्रोलियम कार्पोरेशन कंपनीचा बंद पंप पुन्हा सुरु करुन डिलर्स व डिस्ट्रीब्युटर्स यांच्यात समान न्याय देण्याची विनंती केली.

प्रसिध्दी प्रमुख

योगेश पायघन / गणेश वाघ.

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , yp4329@gmail.com , ydp4329@gmail.com , procbkhaire@gmail.com ganeshwagh4400@gmail.com

8421415255/9420404329 8484066606/9604384400